**निशाणी क्रमांक १ वर आदेश**
**(दिनांक २०/१२/२०२५)**

सदर प्रकरणात प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नामे चेतन बंडू पुलगमकर यांनी त्यांचे आममुखत्यार नामे देवीदास भिकाजी येवले यांचे द्वारे एक ट्रॅक्टर ज्याचा नोंदणी क्र. एम.एच.३४/सी.जे.६४१८, चेचीस क्र. MBNADALBLRZG02604, इंजिन क्र. ZRG2MBA9655 सुपूर्दनाम्यावर मिळण्यासाठी दाखल केलेला आहे व त्याप्रमाणे अर्ज मंजूर होण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, वर नमुद ट्रॅक्टरचा अर्जदार स्वतः मालक आहे. पोलीस ठाणे, राजुरा येथे अपराध क्र.५४७/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ चे कलम ४८(७), ४८(८) व खान अधिनियम, १९५२ चे कलम १ ते ३ नुसार गुन्हा दाखल आहे. पोलीसांनी अर्जदार यांचे ताब्यातील व मालकीचा ट्रॅक्टर जप्त केलेला आहे. सदर ट्रॅक्टर गैरअर्जदार यांच्या ताब्यात असून तसेच पडून राहिल्यास सदर ट्रॅक्टर मध्ये तांत्रीक बिघाड होऊ शकतो, सदर ट्रॅक्टर गंजण्याची शक्यता आहे. तसेच अर्जदाराला सदर ट्रॅक्टर सुपूर्दनाम्यावर मिळाल्यास, त्याची विक्री अथवा इतर विल्हेवाट लावणार नाही, त्याचे रंग,

रुपात व स्वरुपात बदल करणार नाही व तपासकामी न्यायालयाचे आदेशानुसार वेळोवेळी हजर करेल अशी हमी दिली. सबब अर्जदार याने अर्ज मंजूर होण्याची विनंती केली.

३. प्रस्तुत प्रकरणात तपास अधिकारी, विद्वान सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविण्यात आले.

४. तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.०५ वर दाखल करुन थोडक्यात त्यांनी अशी हरकत नोंदविली की, अर्जदार गुन्ह्यात जप्त वाहन पुनश्च अशाच प्रकारचे गुन्ह्यात वापरण्याची शक्यता असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. करीता, सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

५. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे नोंदवून अर्ज नामंजुर होण्याची विनंती केली.

६. प्रस्तुत प्रकरणाचे काळजीपुर्वक वाचन केले.

७. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अभिलेखावरील दस्तऐवजांप्रमाणे त्यांचा युक्तीवाद केला.

८. अर्जदारांचा अर्ज व गैरअर्जदारांचे म्हणणे पाहता खालील मुद्दे या न्यायालयाच्या विचारासाठी उपस्थित झाले आहेत. त्यावर निष्कर्ष ह्या न्यायालयाने खालील नमुद कारणमीमांसेच्या आधारावर नोंदविला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार त्यांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## – कारणमिमांसा –

९. **मुद्दा क्र.१ करीता –** माननीय सर्वोच्च न्यायालयाने ***सुंदरभाई अंबालाल देसाई विरूद्ध गुजरात राज्य,*** **(२००३ ऑल एम आर (फौजदारी) ३६३)** मधील मार्गदर्शक तत्वांचा विचार करता, सदरहू अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे.

**१०.** अर्जदाराने अर्जास अनुसरून यादी (नि.क्र.०३) प्रमाणे योग्य ती कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यांनी सदर प्रकरणात स्वतःचे आधार कार्ड, अधिकारपत्र धारकाचे आधार कार्ड, वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व मुळ अधिकारपत्र दाखल केलेले आहे.

**११.** अभिलेखाचे काळजीपुर्वक वाचन केले असता, हे प्रकर्षाने जाणवते की, अर्जदार हा प्रस्तुत ट्रॅक्टरचा मालक असल्याचे दिसून येते.

**१२.** सदरहु ट्रॅक्टर हे पोलीस ठाणे, राजुरा यांच्या कार्यालयात पडून राहिल्यास त्याचे सुटे भाग खराब होवून त्याची किंमत कमी होवू शकते त्यामुळे प्रस्तुत अर्ज पुढील आदेशापर्यंत मंजूर करणे न्यायोचीत होईल.

**१३.** तपास अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार माननीय तहसिलदार, राजुरा यांच्याकडे महाराष्ट्र जमिन महसुल संहिता, १९६६ नुसार दंडाची कार्यवाही प्रलंबीत आहे. तपास अधिकारी यांचे म्हणणे या घडीला गृहीत धरल्यास, फौजदारी प्रकरण व माननीय तहसिलदार, राजुरा यांचेकडे महाराष्ट्र जमिन महसुल संहिता, १९६६ नुसार प्रलंबीत असलेल्या दंडाची कार्यवाही स्वतंत्र आहे. हे न्यायालय माननीय तहसिलदार, राजुरा यांच्याकडे प्रलंबीत असलेल्या प्रकरणाबाबत हस्तक्षेप करू शकत नाही. त्या प्रकरणावर न्यायनिर्णय देण्याचा अधिकारी हा माननीय तहसिलदार, राजुरा यांच्या न्यायालयाचा, कार्यपद्धतीचा, महाराष्ट्र जमिन महसुल संहिता, १९६६ चा भाग आहे.

**१४.** करीता, हे न्यायालय मुद्दा क्र.१ साठी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**१५.** **<u>मुद्दा क्र.२ करीता</u> –** मुद्दा क्र.१ च्या होकारार्थी निष्कर्षास अनुसरून मुद्दा क्र.२ करीता अर्जदारावर काही अटी व शर्ती लादून हे न्यायालय पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खालील अटी व शर्तीवर अर्जदार नामे चेतन बंडू पुलगमकर यांनी त्यांचे आममुखत्यार नामे देवीदास भिकाजी येवले यांचे द्वारे एक ट्रॅक्टर ज्याचा नोंदणी क्र. एम.एच.३४/सी.जे.६४१८, चेचीस क्र. MBNADALBLRZG02604, इंजिन क्र. ZRG2MBA9655 असा आहे, याचा अंतरीम ताबा पुढील आदेशापर्यंत देण्यात येतो. जप्त मुद्देमालामध्ये रंग, स्वरुप व मालकी हक्कात बदल न करता ट्रॅक्टर ही पुढील आदेश होईपावेतो अंतरिम ताबा म्हणून देण्यात यावा.

अ) अर्जदाराने ट्रॅक्टर रक्कम रुपये ५,००,०००/– (पाच लाख रूपये) यावर हमीपत्र मुद्रांकावर न्यायालयात लिहून द्यावे.

ब) अर्जदाराने ट्रॅक्टर, प्रस्तुत गुन्ह्याचा निकाल लागेपर्यंत त्याची विक्री, गहाण अथवा अन्यप्रकारे हस्तांतरीत करु नये. तसेच त्याचा रंग, स्वरुप यामध्ये बदल करु नये.

क ) सदर ट्रॅक्टरचा उपयोग कोणत्याही अवैध कामासाठी यापुढे करु नये.

ड ) न्यायालयाने आदेश दिल्यास अथवा तपासाच्या दृष्टीने आवश्यकता भासल्यास ट्रॅक्टर हजर करावा.

इ ) सदर ट्रॅक्टर हस्तांतरीत करतांना पोलीस अधिकारी यांनी कायद्याप्रमाणे पंचासमक्ष पंचनामा करुन त्याचे छायाचित्र काढून ते न्यायालयात दाखल करावे.

फ) संबंधीत पोलीस अधिकारी यांना निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी अर्जदाराला ट्रॅक्टर दिल्याबद्दल, सदरच्या प्रकरणाची प्रत ही अपराध क्र.५४७/२०२५ च्या दोषारोपपत्रासोबत जोडावी.

**३.** हे न्यायालय, माननीय तहसिलदार, राजुरा यांच्याकडे महाराष्ट्र जमिन महसुल संहिता, १९६६ नुसार प्रलंबीत असलेल्या प्रकरणाबाबत कोणतेही भाष्य/आदेश पारीत करीत नाही.

SUHAS HARIDAS BELSARE
Digitally signed by SUHAS HARIDAS BELSARE
Date: 2025.12.22 11:29:05 +0530

( एस. एच. बेलसरे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), राजुरा,
जिल्हा– चंद्रपूर

स्थळ – राजुरा
दिनांक – २०/१२/२०२५